राज्यातील विडी उद्योगातील कामगारांसाठी पुन:निर्धारित केलेल्या किमान वेतन दराचा फेरआढावा घेण्याकरीता व किमान वेतनाचे नवीन दर ठरविण्याकरिता शासन,मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधी यांची त्रिपक्षीय समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग ,ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : किवेअ-२०१८/प्र.क्र/ ६६.काम-७

हुतात्मा राजगुरु चौक ,मादाम कामा रोड,

मंत्रालय ,मुंबई -४०० ०३२,

दिनांक : ११ मे, २०१८

प्रस्तावना-:

राज्यातील विडी उद्योगातील कामगारांचे किमान वेतन दरांचे पुन:निर्धारण शासनाने दिनांक १० नोव्हेंबर , २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे रुपये २१०/- प्रति दिन एवढे किमान वेतन निर्धारीत केले आहे .विडी उद्योगातील मालकवर्गाने सदर किमान वेतन दर पुन:निर्धारित करताना त्यांची बाजू ऐकून घेतली नसून प्रारुप अधिसूचना व अंतिम अधिसूचना दरामध्ये मोठी वाढ करण्यात आली असून ती समर्थनीय नाही तसेच इतर राज्यातील दरसुध्दा विचारात घेण्यात आलेले नसल्याने त्याचे पुनर्विलोकन होणे आवश्यक असल्याबाबतचा आक्षेप घेतलेला आहे .त्यानुषंगाने दिनांक २१ एप्रिल २०१८ रोजी मा .राज्यमंत्री) कामगार (यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत किमान वेतन दराचा फेरआढावा घेऊन किमान वेतनाचे दर निश्चित करण्याकरिता शासन,मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधी यांची त्रिपक्षीय समिती गठित करण्याचे निदेश मा .राज्यमंत्री (कामगार) यांनी दिले आहेत .त्यानुसार कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली त्रिपक्षीय समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील विडी उद्योगातील कामगारांचे दिनांक १० नोव्हेंबर,२०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे निर्धारित केलेल्या किमान वेतनदरांचा फेर आढावा घेण्यासाठी आणि किमान वेतनाचे नवीन दर निश्चित करण्यासाठी किमान वेतन अधिनियम ,१९४८ मधील कलम ५ (१) (अ (नुसार कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शासन ,मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधी यांची त्रिपक्षीय समिती पुढील प्रमाणे गठित करण्यात येत आहे:-

शासन प्रतिनिधी	कामगार आयुक्त, मुंबई	अध्यक्ष
	उप सचिव (कामगार-७)	सदस्य
	उप आयुक्त कामगार, नाशिक	सदस्य
	सहाय्यक आयुक्त, कामगार,सोलापूर	सदस्य
कामगार प्रतिनिधी	श्री. नरसय्या नारायण आडम,माजी आमदार	सदस्य
	डॉ. गोवर्धन सुंचू	सदस्य
	श्री. विष्णू कारमपुरी	सदस्य
	श्री. हरिभाऊ तांबे	सदस्य
	श्री. सचिन मेंगाणे	सदस्य
	श्रीमती. पद्मा म्हंता	सदस्य

मालक प्रतिनिधी	श्री. कैलासशेठ किसनलाल गोरंटयाल,माजी आमदार	सदस्य
	श्री. सुधीर शंकर साबळे	सदस्य
	श्री. सुनील दिनकरसा क्षत्रिय	सदस्य
	श्री.ओमप्रकाश बिरदीचंद तिवाडी	सदस्य
	श्री.बाळासाहेब अण्णासाहेब जगदाळे	सदस्य
	श्री.शिवकुमार शंकरराव ठाकूर	सदस्य
उप आयुक्त(कामगार)	कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई	सदस्य सचिव

२. समितीची कार्यकक्षा:-

सदर समिती दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे निर्धारित केलेला किमान वेतन दर निश्चितीची व मालकवर्गाच्या आक्षेपांची तपासणी करेल. समिती किमान वेतनाचे नवीन दर निश्चित करण्यासाठी शिफारस करेल. समितीस या व्यवसायातील संबंधीत व्यक्तीचे व इतर अधिकाऱ्यांचे मत विचारण्यास/ जाणून घेण्यास मुभा राहिल. त्रिपक्षीय समिती शासनास ३ महिन्यांच्या कालावधीत अहवाल सादर करेल.

३. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०५१४१७०१२६६८१० असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.05.14 17:02:17 +05'30'

(श. मा. साठे)

उप सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,

२. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,

३. प्रधान सचिव ,कामगार यांचे स्वीय सहाय्यक,

४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५. उप सचिव,कामगार यांचे स्वीय सहाय्यक,

६. समितीचे इतर सर्व सदस्य (द्वारा कामगार आयुक्त)

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

८. निवड नस्ती कामगार-७